# मुंबई मेट्रो ३च्या बॅटरी शटरची यशस्वी चाचणी

**मुंबई (वार्ताहर) :**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो मार्ग- ३ च्या ८ डब्यांच्या पहिल्या प्रोटोटाइप गाडीची बॅटरी शटर चाचणी सोमवारी मरोळ-मरोशी येथे यशस्वीपणे पार करण्यात आली.

या शटरने मेट्रो-३ची पहिली गाडी मरोळ-मरोशी येथील सारिपुत नगर येथे तात्पुरत्या उभारलेल्या मेट्रो कारशेडच्या जागेवर आणण्यात आली. पहिल्या आठ डब्यांच्या गाड्यांची चाचणी यशस्वीरित्या पार पाडली. या चाचणीमध्ये येथे गाडी डिलिव्हरी आणि चाचणी ट्रेकसाठी उभारलेल्या तात्पुरत्या सुविधेमध्ये पहिल्या ८ डब्यांची जुळवणी केली गेली. या छोट्या शटरची क्षमता ३५० टन वजन खेचण्याची आहे. गाडीची बॅटरी पूर्णपणे चार्ज असताना हे शटर ८ डब्यांची गाडी ९ कि.मी.पर्यंत खेचू शकते. तसेच हे शटर सतत ५० किलो न्यूटन क्षमतेने काम करू शकते. या बॅटरी शटरची त्याच्या स्वयंचलित कप्लर तसेच ॲडॉप्टरसह यशस्वीरीत्या चाचणी करण्यात आली. हे दोन्ही कप्लर मेट्रोचे डबे जोडण्यासाठी वापरले जातात.

